# निवडक ग्रामीण कथाकारांच्या लेखनवैशिष्ट्यांचे तौलनिक अध्ययन

प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
E mail: pavanmandavkar@yahoo.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## गोषवारा

ग्रामीणत्व हे ग्रामीण कथेचे वैशिष्ट्य असते. त्यात ग्रामीण परिसरातील सर्व गोष्टी प्रतिबिंबित होत असतात. मराठी ग्रामीण कथेचा आढावा घेताना सुरुवातीला हरीभाऊंचे नाव समोर येते. 'काळ तर मोठा कठीण आला' या कथेतून त्यांनी ग्रामीण भागातील दुष्काळाचे यथार्थ वर्णन केले आहे. ह.ना. आपटे यांच्या प्रभावातून फुललेली श्री.म. माटे यांची कथा ग्रामीण कथाक्षेत्रात महत्त्वाची मानली जाते. 'माणदेशी माणसं' यातून व्यंकटेश माडगूळकरांची ग्रामीण कथा वाचकांच्या भेटीला येते. शंकर पाटलांची रांगडी भाषेने नटलेली, ग्रामीण व्यक्तिमनाचा ठाव घेणारी, भावनांचे बारकावे टिपणारी कथा मराठी ग्रामीण साहित्यात मोलाची भर घालणारी आहे.

## Abstract:

Rurality is a characteristic of rural narrative. Everything in the countryside is reflected in it. While reviewing the Marathi rural story, the name of Haribhau Apate, first come to the fore. He has described the famine in the rural areas through the story 'Kal tar motha kathin ala' (Time has come very difiicult). Inflated by H.N. Apte's influence, S.M. Mate's story is regarded as important in the rural narrative. From the 'Madheshi Manse' (People of Mandesh), the rural story of Venkatesh Madgulkar comes to the reader. The story of Shankar Patil in a colorful language, about a rural person and of the emotional commentary is adding value to Marathi rural literature.

बीजशब्द :— ग्रामीण कथा, निसर्ग, माणूस, नवकथा, शेतकरी, जाणिवा

## प्रस्तावना

कथा हा एक लवचिक वाङ्मयप्रकार आहे. स्थलपरत्वे, कालपरत्वे, व्यक्तिपरत्वे कथेचे स्वरूप बदलते. आजूबाजूच्या परिस्थितीचे कथेवर जे प्रतिबिंब पडते, त्यातून कथेची वेगवेगळी वैशिष्ट्ये सहज ओळखू येतात. जसे दलित साहित्य हे अस्पृश्यांच्या व्यथावेदनेतून जन्माला येते, प्रादेशिक वाङ्मयात त्या त्या प्रदेशाची वैशिष्ट्ये उतरलेली असतात. तसेच ग्रामीण कथेत ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले असते. ग्रामीण परिसरातील निसर्ग, शेती, तेथील माणसांची मातीशी असलेली बांधिलकी, त्या विशिष्ट प्रादेशिकतेशी संबंधित व्यवसाय, लोकाचार, तेथील सामाजिक, धार्मिक, राजकीय जीवनपद्धतीतील वैशिष्ट्यपूर्णता, त्यांच्या समस्या, प्रश्न, मर्यादा व एकूणच ग्रामीण संस्कृतीचे आकलन ग्रामीण कथेतून आविष्कृत होते. विविध लेखकांनी ग्रामीण मराठी साहित्य क्षेत्र आपापल्या गुणवैशिष्ट्यांनी मोठ्या प्रमाणात समृद्ध केले आहे.

## ग्रामीण साहित्याचा उदय

भारत हा खेड्यांचा देश आहे, हे जरी खरे असले तरीही या खेड्यातील ग्रामीण जीवन साहित्यापासून बराच काळ दूरच राहिले. कदाचित ग्रामीण भागातील जनतेला बेभरवशाच्या शेतीव्यवसायातून स्वत:च्या जीवनाकडे तटस्थतेने पाहण्यासाठी किंवा जीवनाभिव्यक्ती करण्यासाठी फुरसतच मिळाली नसेल. गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या हाकेमुळे काही प्रमाणात तरी

खेड्याकडे लोकांची दृष्टी वळली. ग्रामीण भागही साहित्यविषय होऊ शकतो ही जाणीव साहित्यिकांना झाली. तत्पूर्वीचे ग्रामीण चित्रण अत्यंत मर्यादित स्वरूपात साहित्यात झळकत होते. ग्रामीण भागातील अज्ञान, मागासलेपणा, विसंगती, निसर्गाचे आगळेपण, रांगडा प्रणय या सगळ्या गोष्टी साहित्यात तोंडी लावणे म्हणून येत होत्या. गांधीजींच्या आवाहनानंतर काही प्रमाणात परिस्थिती बदलली. याबाबत नरहर कुरुंदकर म्हणतात, 'भारत देश खेड्यात राहतो याची उत्कट जाणीव सुशिक्षित भारतीयांना गांधीजींनी करून दिली. एकतर गांधीजींमुळे आम्ही ग्रामीण भागाकडे आस्थेने पाहू लागलो. दुसरे म्हणजे केतकरांच्या पासून व्यक्तीच्याऐवजी समाजजीवन चित्रित करण्याकडे आमचा कल वाढू लागलेला होता. आणि तिसरे म्हणजे, ललित वाङ्मयात फडक्यांच्या कालखंडात निसर्गवर्णनांना एक स्वतंत्र महत्त्व दिले जात होते. या सर्व घटकांचा संमिश्र परिणाम म्हणून क्रमाने प्रादेशिक अगर ग्रामीण असे ज्या वाङ्मयाला म्हटले जाते, ते वाङ्मय उदयाला येऊ लागले.'[१]

## निवडक चार ग्रामीण कथाकार

हरिभाऊ – मराठी ग्रामीण कथेच्या उगमाचा शोध घेताना हरिभाऊंच्या कालखंडापर्यंत मागे जावे लागते. हरिभाऊंचा काळ म्हणजे मराठी वाङ्मयातील सुधारणावादाचा काळ. हरिभाऊंच्या कथा, कादंबऱ्यांमधून सुधारणावादाचे पडसाद उमटलेले दिसतात. इंग्रजी राजवटीमुळे पाश्चात्यांशी जवळून संबंध, सहवास, पाश्चात्य शिक्षण यामुळे नवीन विचारांचा प्रभाव हरिभाऊंवर पडला. त्यांच्या साहित्यातून तो स्रवला. त्या दरम्यान डेक्कन सभेच्या कागदपत्रांतून हरिभाऊंना दुष्काळग्रस्त जीवनाच्या वाताहतीची जी काही माहिती वाचायला मिळाली, तिच्यावर आधारित असलेली 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा त्यांनी लिहिली. ही संपूर्णत: वास्तवावर आधारित असलेली कथा असल्यामुळे त्यात कल्पनाविलास नव्हता. शेतकऱ्यांची दैन्यावस्था पांढरपेशा वर्गापर्यंत पोचविणे हा निकोप हेतू हरिभाऊंच्या या कथेतून जाणवतो. हरिभाऊंच्या या कथेने मराठी ग्रामीण कथेला एक निश्चित चेहेरामोहरा मिळवून दिला. काही दोष या कथेत होते, जसे या कथेतील सूक्ष्मतेचा अभाव, एखादी पूर्ण माहिती असलेली घटना स्थूलमानाने विस्तारून सांगणे असे या कथेचे स्वरूप आहे. शेतकरी जीवनाच्या अंतरंगात शिरून त्याच्या शक्याशक्यतेचा पडताळा घेण्याचा येथे प्रयत्न नाही. त्यामुळे केवळ सहानुभूतीच्या भावनेने सांगितलेली एक गोष्ट अशा रूपात ती वाचकासमोर उरते. दुष्काळाच्या दु:खातून प्रसवलेल्या या कथेनंतर हरिभाऊंनी नागर जीवनावर आधारित अनेक कथा लिहिल्या. ग्रामीण साहित्यात त्यानंतर त्यांचे विशेष लिखाण दिसत नाही. तरीही त्यांच्या समकालीनांना या कथेमुळे ग्रामीण साहित्याची ओळख झाली, आणि त्यांच्या प्रेरणेने अनेक कथाकार कथाक्षेत्रात उतरले.

श्री.म. माटे – हरिभाऊंच्या प्रेरणेने लिखाण करणाऱ्यांमध्ये श्री. म. माटे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. हरिभाऊ 'ग्रामीण मराठी कथेचे 'उगमस्थान' असतील तर माटे हे 'ग्रामीण मराठी कथेचे जनक' आहेत. १९४१ साली 'उपेक्षितांचे अंतरंग' यातून श्री.म. माट्यांनी मराठी कथाक्षेत्रात एक नवीन वळण आणले. माणसाचे माणूस म्हणून असणारे मोल हे निहित सत्य मानून माटे यांनी कथालेखन केले. समाजाच्या उतरंडीतील निम्नस्तरावरच्या माणसांचे, त्यांच्या दैन्यावस्थेचे, उपेक्षेचे, आंतरजीवन वास्तवपणे रेखाटून माट्यांनी त्यांची संवेदनशीलता दर्शविली आहे. त्यांच्या कथांना एक रसरशीत जिवंतपणा प्राप्त झाला आहे. हरिभाऊंच्या प्रेरणेने जरी माट्यांनी लिखाणाला सुरुवात केली असली तरी हरिभाऊंच्या कथेतील सुधारणावादाचा अतिरेक माट्यांच्या कथेत दिसत नाही. कथा लिहिताना कुठलाही समाजवाद, साम्यवाद, गांधीवादाचा पुरस्कार त्यांनी केला नाही. वयाच्या पन्नाशीत लेखनाला प्रारंभ केला असल्यामुळे त्यांच्या लेखनात प्रगल्भता आहे. सुधारणावादातील भपकेबाजपणा टाळून त्यांनी वास्तवजीवन त्यातील कारुण्यासह जसेच्या तसे उतरवले आहे. सुधारणावादाचे बोट धरून त्यांची पात्रे आदर्शवादाची वाटचाल करीत नाहीत. 'बन्सिधरा, आता तू कुठेरे जाशील?', 'सावित्री मुक्यानेच मेली', 'पिऱ्या' यांसारख्या कथांतून शोषित पीडितांच्या जीवनातील व्यथांना यथार्थपणे वाचकांसमोर आणले.

माट्यांचे कथानिवेदन साधेच पण ढंगदार आहे. मानवी मनाची स्पंदने हळुवारपणे टिपून त्या अनुषंगाने जीवनाचा पट उलगडून दाखविणे माट्यांना चांगले जमते. माट्यांपूर्वीची कथा काहीशी अतिरंजित, ओबडधोबड होती. तिला त्यांनी आशयसंपन्न केली. बोलीभाषेला उठाव दिला. 'माट्यांचे विश्व मर्यादित असूनही वास्तवातील सहजतेने व आशयातील जिवंतपणाने या कथांना एक आवाहनक्षमता लाभली. श्रृंगार, काव्यमय प्रसंग, खटकेबाज संवाद यांचा कसलाही मागोवा न घेता ही कथा मनाचा ठाव घेते. डॉ. आनंद यादव यांनी म्हणूनच माट्यांना 'ग्रामीण कथेचे जनक म्हटले आहे.'[२] माट्यांवर कधीकधी मानवतावादी दृष्टिकोनामुळे कंटाळवाणेपणाचा आरोप लावण्यात येतो. भावविवशतेची जाणीव कथा वाचताना निर्माण होते. माट्यांनी हरिभाऊंचा मागोवा घेतलेला असल्यामुळे कधीकधी त्यांचे दोषही त्यांना चिकटलेले दिसतात. तरीही त्या

काळातील माट्यांचे हे वाङ्मयीन कर्तृत्व अजोड आहे. माट्यांच्या लिखाणातून कळत नकळत प्रेरणा घेऊन अनेक लेखक या क्षेत्रात उतरले. म्हणूनच त्यांना 'ग्रामीण कथेचे अग्रदूत' अशीही संज्ञा दिली जाते.

<u>व्यंकटेश माडगूळकर</u> (स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची ग्रामीण कथा) — १९४५ च्या दरम्यान माडगूळकरांनी मौज, सत्यकथेतून ग्रामीण कथालेखनाला सुरूवात केली. माडगूळकरांपूर्वीच्या कथाकारांपेक्षा माडगूळकरांचे लेखन काहीसे वेगळे आणि सकस आहे. सतत नेटाने ग्रामीण कथांचे लेखन करणाऱ्या माडगूळकरांनी माणदेशी वैराण माळावरील दैन्य दु:ख अज्ञान घेऊन 'माणदेशी माणसं' चित्रित केली. त्यांची निवेदनशैली साधी, सरळ होती. सोप्या शब्दातून जीवनाला स्पर्श करणाऱ्या ओळी लिहिणे हे माडगूळकरांचे वैशिष्ट्य आहे. या वेगळेपणामुळेच माडगूळकर त्यांच्या मागील कथाकारांपेक्षा अधिक उंचीवर गेले आहेत. या उंचीबरोबरच जीवनाच्या अंतरंगात डोकावणारी सखोलताही त्यांच्या लिखाणाला आहे. माडगूळकरांच्या कथेत ग्रामीण जीवनातील स्वार्थीपणा, बेरकीपणा, सोशिकपणा, क्रूरपणा, या सगळ्या वैशिष्ट्यांचा मागोवा घेतलेला दिसतो. कोंडिबा गायकवाड, धर्मा रामोशी, शिदा चांभार यांसारख्या व्यक्तिरेखा त्यांच्या स्वाभाविक गुणवैशिष्ट्यांसह ते अस्सलपणे रेखाटतात. त्यांच्या कथेतील ओघवतेपणे येणारे ग्रामीण शब्द कथेतील जिवंतपणा अजूनच वाढवितात. माट्यांनंतर उपेक्षितांचे अंतरंग त्यांच्या बारकाव्यांसह टिपणारे माडगूळकरच आहेत. प्रत्यक्षानुभूतीतून जोमाने लिहिलेल्या त्यांच्या कथा विविध छटांनी नटलेल्या आहेत. माणदेशी माणसं, गावाकडच्या गोष्टी, हस्ताचा पाऊस, उंबरठा, वारी इ. कथासंग्रहातून माणदेशी जीवनाचे त्यांच्या वैशिष्ट्यांसह वास्तविकपणे दर्शन घडविणारे व्यंकटेश माडगूळकर हे गाडगीळ, गोखले, भावे यांच्या मालिकेतील 'नवकथेचे प्रवर्तक' आहेत.

माडगूळकरांची कथा वैविध्यामुळे आकर्षक ठरते. त्यांच्या लेखनात कुठेही आक्रोश, आक्रस्ताळेपणा, दिसत नाही. वास्तविक जीवनाचे दर्शन घडविणारी असली तरी त्यांची कथा वास्तवाचे दाहक चटके वाचकांना देत नाही. घटना प्रसंगांतून विविध भावनांची रिमझिम शिंपडण चालू असल्यामुळे ती करुण कथा असली तरी मनाला समाधान देणारीच असते. माटे किंवा अण्णाभाऊ साठे यांच्या लेखणीतले झपाटलेपण त्यांच्यात नाही पण त्याच तीव्रतेच्या भावनांचे हळुवारपणे गहिरे चित्रण त्यांच्या कथांत आढळते. ' त्यांच्या ठिकाणी लेख्य वस्तूविषयी अकृत्रिम जिव्हाळा म्हणून जीवनाची जिवंत चित्रे ते रेखाटू शकले. '[३]
माडगूळकर त्यांच्या आधीच्या ग्रामीण कथाकारांपेक्षा वेगळे वाटतात, याचे कारण त्यांच्यावर त्यांच्या कालखंडाचा वेगळा प्रभाव पडला होता. स्वातंत्र्यामुळे संपूर्ण देशात काही उलथापालथी घडत होत्या. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राने वाङ्मयीन आत्मनिष्ठांना नवे परिमाण मिळवून दिले होते. या राजकीय सामाजिक, वाङ्मयीन दृष्टीचा माडगूळकरांच्या साहित्यनिर्मितीवर निश्चितच परिणाम झाला. तत्पूर्वीच्या लेखकांच्या साहित्याला चिकटलेले बोधवाद, रंजनवाद, इतिहासाभिमानाचे दोष यांपासून माडगूळकर दूर राहिले. एकाच अनुभवविश्वाचा वेगवेगळ्या संवेदनांच्या लोकांवर वेगवेगळा परिणाम व्हावा तसे समान अनुभवविश्व असुनही वेगळ्या जातीची कथा माडगूळकरांनी लिहिली. 'माडगूळकरांच्या कथांत पात्रांना महत्त्व आहे, कथानकाला नव्हे. म्हणून कथानकाची कृत्रिम रचना करण्याचा प्रयत्न ते करीत नाहीत. '[४]

माडगूळकरांच्या पूर्वार्धातील कथालेखनावर श्री.म. माटे यांच्या कथेची काहीशी छाप पडलेली जाणवते. शेवटी एखादे प्रश्नार्थक वाक्य देऊन त्याचा निर्णय वाचकावर सोपवायचा, ही माट्यांची वाचकांना कथेत सामावून घेण्याची शैली माडगूळकरांनीही काही ठिकाणी वापरलेली दिसते. उदा. 'बन्सिधरा, तू आता कोठेरे जाशील?' असे माटे आपल्या कथेच्या शेवटी वाचकांना विचारतात, तर माडगूळकर 'आता या मोमिनांच्या पोरांनी काय करावं?'' असे म्हणून वाचकांसमोर प्रश्न उभा करतात.

<u>शंकर पाटील</u> — स्वातत्र्योत्तर काळात ग्रामीण नवकथेच्या स्थित्यंतरात शंकर पाटील यांचे स्थान महत्वाचे आहे. १९४९ पासून साधारणत: त्यांनी कथालेखनाला सुरुवात केली. माडगूळकरांनंतर तीनचार वर्षांनी पाटलांनी कथालेखनाला सुरुवात केली. पाटलांच्या सुरुवातीच्या कथालेखनात अनेक कच्चे दुवे होते. ग्रामीण मुखवटा धारण केलेल्या पण ग्रामीणत्वाचा अभाव असलेल्या कथा त्यांनी लिहिल्या. माडगूळकरांचा प्रभाव त्यांच्यावर होता, हे ते स्वत:च कबूल करतात. पुढे पाटलांच्या लिखाणातील कच्चे दुवे कमी होत होत परिपूर्णतेकडे त्यांची कथा वाटचाल करू लागली. १९५८ मध्ये आलेल्या 'वळीव' या कथासंग्रहापासून 'शांकर कथा' या १९८२ मध्ये आलेल्या कथासंग्रहाचे वाचकांनी उत्साहात स्वागत केले. दरम्यान 'भेटीगाठी, खेळखंडोबा, फक्कड गोष्टी, गारवेल, आभाळ, धिंड, ऊन, ताजमहालमध्ये सरपंच, वावरी शेंग, पाम, सरपंच, नाटक, भूजंग, शाळा, वळीव असे एकापेक्षा एक सरस कथासंग्रह शंकर पाटलांनी लिहिले. त्यांच्या अनेक कथासंग्रहांना महाराष्ट्र शासनाची पारिताषिके मिळाली आहेत. केवळ संख्यात्मकदृष्ट्याच नाही तर गुणात्मकतेच्याही बाबतीत त्यांच्या कथा सरस आहेत.

पाटील माडगूळकरांची कथा वाचून लिहू लागले असले, तरी त्यांची स्वत:ची अशी काही वेगळी वैशिष्ट्ये होती. शंकर पाटलांनी आपल्या प्रकृतिधर्मानुसार कथालेखन केले. त्यांचे समकालीन किंवा पूर्वसूरींचा ठसा त्यांनी आपल्या लिखाणात येऊ दिला नाही. माणूस, त्याचे बाह्य विश्व, आंतर विश्व, माणसामाणसातील परस्परसंबंध, गुंतागुंत, कुटुंबातील माणसांची नाती अशा व्यक्तिमनाचा शोध घेण्याच्या वैचारिकतेतून पाटलाची कथा स्फुरत गेलेली आहे. माडगूळकरांची कथा सहानुभूतीने माणदेशाचे दैन्य टिपताना तेथील घटना परिसराला उजाळा देते, तर पाटलांची कथा व्यक्तिमनाच्या अंतरंगाला अवगाहन करते. त्यांच्या कथेत घटनाप्रसंगांना दुय्यम स्थान होते. त्यांच्या कथेचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते कथेत मानसिक आंदोलनाला प्रधान्य देतात. त्यांच्या अनुषंगाने कथा फुलवितात, आणि ही आंदोलने रेखाटून झाली की, लगेच त्यांची कथा संपुष्टात येते. उदा. एखाद्या रंगलेल्या कुस्तीच्या खेळाचे वर्णन पाटील अगदी मनापासून करतात. ते वाचून वाचकांची विजेत्याविषयी उत्कंठा वाढते, आणि या सर्वोच्च उत्कंठेच्या क्षणीच कथेचा शेवट होतो. अशावेळी वाचकांना त्याच्यात अपुरेपणा वाटतो. पाटलांची कथा मात्र या सांकेतिकतेपासून स्वत:ला वेगळे ठेवते. त्यांना कथेत प्रत्यक्ष कुस्तीचा निर्णय लावण्यात रस नाही, तर संबंधित घटनेतील विविध बारकावे, प्रतिक्रिया यांचे वर्णन करण्यात विशेष रस आहे.

काळानुसार बदललेल्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करताना पाटलांची सर्जनशीलता विशेषत्वाने बहरते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात राजकीय व्यक्तींनी प्रत्येक क्षेत्र आपल्या स्वार्थासाठी कसे भ्रष्ट आणि हतबल करून टाकले, याचे ते व्यंगात्म चित्रण करतात. ग्रामीण भागात नेहमी दिसणारी फसवेगिरी, कृत्रिमता, विफलता, कामचुकारपणा, चवचालपणा यांचे यथार्थ चित्रण पाटील करतात. कोणत्याही सरकारी योजनेचे मूळ उद्दिष्ट कितीही विधायक असले तरी प्रत्यक्षात तिचा कसा बोजवारा उडतो. शेवटी या सगळ्या गोंधळाची झळ सामान्यांनाच कशी बसते हे वाचताना पाटलांच्या निरीक्षण शक्तीला वाचक मनोमन दाद देतो. खुसखुशीत संवाद, वाचकमनाचा केलेला विचार, योग्य वातावरण निर्मिती, ग्रामीण संसाराचे अस्सल चित्रण, करुणरम्यता, भावनांची खळखळ, गुंतागुंत, बहुविधता, स्त्रीजीवनाची भेदक चित्रणे या सगळ्या वेशिष्ट्यातून फुललेली मधे कधी विनोदाचा शिडकावा करणारी पाटलांची कथा वाचणे म्हणजे सर्व स्तराच्या वाचकांसाठी मेजवानी आहे. एकुणच बहुढंगी, बहुरंगी अशा पाटलांच्या कथांमुळे ग्रामीण मराठी कथावाङ्मयाच्या समृद्धीत मोलाची भर पडली यात शंका नाही.

## या ग्रामीण कथाकारांच्या लेखनवैशिष्ट्यांचे तौलनिक अध्ययन

ग्रामीण मराठी कथाक्षेत्रातील मैलाचे दगड म्हणता येतील असे हे चार कथालेखक म्हणजे ह. ना. आपटे, श्री. म. माटे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील. या सर्वच लेखकांना कथासाहित्यात कोणत्या ना कोणत्या विशेषणाने गौरविल्या गेले. हरिभाऊंना 'ग्रामीण मराठी कथेचे उगमस्थान' म्हणून संबोधिले गेले. 'ग्रामीण मराठी कथेचे जनक' अशी मानाची पदवी श्री.म. माटे यांनी मिळवली. व्यंकटेश माडगूळकर हे गाडगीळ, गोखले, भावे यांच्या मालिकेतील 'नवकथेचे प्रवर्तक' आहेत, असे सन्मानाने म्हटले गेले. तर शंकर पाटील यांची  कथा 'बहुरंगी, बहुढंगी, बहूविधतेने नटलेली' या वैशिष्ट्यांनी गौरविली गेली.
ह. ना. आपटे यांनी ग्रामीण कथेला सुरुवात केली. त्यांनतर माट्यांनी हरिभाऊंपासून प्रेरणा घेऊन कथालेखनाला प्रारंभ केला. माडगूळकरांना माट्यांच्या लेखनामुळे प्रेरणा मिळाली. तर शंकर पाटील माडगूळकरांच्या कथा वाचून ग्रामीण कथाक्षेत्रात आले. आपल्या आधीच्या लेखकांकडून प्रेरणा घेऊन या लेखकांनी कथालेखनाला सुरुवात केली आहे, तरीही पूर्वसूरींपेक्षा काहीतरी वेगळेपणा या सर्वच लेखकांच्या कथेत आहे. हे वेगळेपण ओढूनताणून आणलेले नाही. ती त्यांची सहजप्रवृत्ती आहे. आपट्यांच्या कथेतील कारुण्य त्यांच्या मनाला झालेल्या दुष्काळाच्या वेदनेतून स्फुरलेले आहे. माट्यांचा पिंडच उपेक्षितांचे अंतरंग समजून घेण्याचा असल्यामुळे स्वजातीची सगळी बंधने ओलांडून सर्व जातीधर्मातील उपेक्षितांची वेदना माटे तरलपणे मांडतात. माडगूळकरांना लेख्य वस्तूंविषयी अकृत्रिम जिव्हाळा असल्यामुळे जीवनाची जिवंत चित्रे ते रेखाटू शकतात. शंकर पाटलांच्या कथेला व्यक्तिमनाचा एकएक पापुद्रा उलगडीत त्यांच्या तळाचा शोध घेण्याची आवड आहे. म्हणजे मानवाच्या चीरवेदना चित्रित करण्याचा सगळ्यांचा उद्देश एक असला तरी मार्ग सगळ्यांनी थोडेफार तरी वेगळे निवडले आहेत.

अर्थात आधीच्या लेखकांच्या प्रेरणांचे पडसाद या लेखकांवर काही प्रमाणात दिसतात. जसे हरिभाऊंच्या कथेतील आदर्शवाद, सुधारणावाद माट्यांच्या कथेतही येतो. कधीकधी अतिभावनाशीलतेने त्यांची कथा हरिभाऊंसारखीच बोजड, कंटाळवाणी वाटते. माडगूळकरांच्या पूर्वार्धातील कथालेखनावर श्री.म. माटे यांच्या कथेची काहीशी छाप पडलेली जाणवते. शेवटी एखादे प्रश्नार्थक वाक्य देऊन त्याचा निर्णय वाचकांवर सोपवायचा, ही माट्यांची वाचकांना कथेत सामावून घेण्याची शैली माडगूळकरांनीही काही ठिकाणी वापरलेली दिसते. उदा. 'बन्सिधरा, तू आता कोठेरे जाशील?' असे माटे आपल्या कथेच्या शेवटी वाचकांना विचारतात, तर माडगूळकर 'आता या मोमिनांच्या पोरांनी काय करावं?' असे म्हणून वाचकांसमोर

प्रश्न उभा करतात. शंकर पाटील 'माडगूळकरांची कथा वाचून मी लिहू लागलो', असे स्वत:च म्हणतात. त्यामुळे सुरुवातीच्या पाटलांच्या कथा ग्रामीण मुखवटा धारण केलेल्या होत्या. त्यानंतर त्यांना स्वत:ची शैली गवसली आणि पाटलांची कथा एकदम बहरली.

हरिभाऊंनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ग्रामीण कथा विशिष्ट दुष्काळी भागातील लोकांचे चित्रण करणारी होती. माट्यांनी आपल्या कथेत चांभार, महार, मांग, रामोशी या जातीतील लोकांचे चित्रण केले. माडगूळकरांनी माणदेशी माणसांचे चित्रण केले. पाटलांच्या कथेतील ग्रामीण माणूस कोणत्याही ग्रामीण भागात आढळू शकतो.
एकूणच या सर्वच लेखकांनी ग्रामीण मराठी साहित्य क्षेत्र आपापल्या गुणवैशिष्ट्यांनी मोठ्या प्रमाणात समृद्ध केले आहे.

## निष्कर्ष

१. स्थलपरत्वे, कालपरत्वे, व्यक्तिपरत्वे कथेचे स्वरूप बदलते.
२. ग्रामीण संस्कृतीचे आकलन ग्रामीण कथेतून आविष्कृत होते.
३. गांधीजींच्या 'खेड्याकडे चला' या हाकेमुळे ग्रामीण भागही साहित्यविषय होऊ शकतो ही जाणीव साहित्यिकांना झाली.
४. हरिभाऊंच्या या 'काळ तर मोठा कठीण आला' या दुष्काळावर आधारित कथेने मराठी ग्रामीण कथेला एक निश्चित चेहेरामाहोरा मिळवून दिला.
५. हरिभाऊंच्या प्रेरणेने अनेक कथाकार कथाक्षेत्रात उतरले.
६. १९४१ साली 'उपेक्षितांचे अंतरंग' यातून श्री.म. माट्यांनी मराठी कथाक्षेत्रात एक नवीन वळण आणले.म्हणूनच माट्यांना 'ग्रामीण कथेचे जनक' म्हटले आहे.
७. माडगूळकरांपूर्वीच्या कथाकारांपेक्षा माडगूळकरांचे लेखन काहीसे वेगळे आणि सकस आहे.
८. शंकर पाटील यांची कथा 'बहुरंगी, बहुढंगी, बहुविधतेने नटलेली' या वैशिष्ट्यांनी गौरविली गेली.

## संदर्भ

१. कुरुंदकर, नरहर, 'वानवळा' प्रस्तावना, अमेय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९७९, पृ. ९.
२. चवरे, डॉ. रा.गो., 'मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह', ग्रामीण कथावाङ्मय, सुयश प्रकाशन, पुणे, २००३, पृ. २६३.
३. यादव, डॉ. आनंद, 'नवसमीक्षा : काही विचारप्रवाह ' मेहता पब्लिकेशन्स, पुणे, संपा. गो.म. कुळकर्णी, प्र. आवृत्ती, १९८२, पृ. २०६.
४. गाडगीळ गंगाधर, खडक आणि पाणी, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, १९८५, पृ. १६३.

❖❖❖

Published Details
Niwadak Gramin Kathakaranchya Lekhan Vaishistyanche Taulanik Adhyayan, UGC sponsored National Conference, 'Gramin Sahityache Marathi Wangamyat Yogdan' Indira Mahavidyalaya, Kalamb, Dt. 6/08/2016, ISBN 978-93-5267-016-1, pp. 185-189